# प्रेसनोट दि.१३/०९/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभागाकडुन वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश करुन एका अल्पवयीन पिडीत मुलींची सुटका

दि.११.०९.२०१७ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेमध्ये पिडीत मुलीच्या आईने चार महिन्यापुर्वी अल्पवयीन मुलगी सुमारे ४ महिन्यापासुन बेपत्ता असलेबाबत व तीचा शोध होणे बाबत अर्ज दिला. सदर अर्जाचे गांभीर्य लक्षात घेवुन सामाजिक सुरक्षा विभाग कडील श्री.संजय पाटील, पोलीस निरीक्षक यांनी सपोनि शीतल भालेकर व पोलीस स्टाफ यांना कोल्हापुर येथे तात्काळ रवाना केले. सदर पोलीस स्टाफने कोल्हापुर पोलीसांचे मदतीने अल्पवयीन मुलगी वय १७ वर्षे हिस ताब्यात घेवुन पुणे येथे सुखरुप आणुन तीच्याकडे सखोल चौकशी करुन ९ आरोपी विरुध्द भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन कडील गुरनं. ४४३/२०१७ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ३,४,५,६,९ सह भा.दं.वि.क. ३७०, ३७०(अ), ३७३, ३७६, ३६६(अ),११९,३४ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम सन २०१२ चे क. ४,६,१७ प्रमाणे अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हा हा १) सोनी रा.चिंचपाडा नवी मुंबई पुर्ण नाव पत्ता माहीत नाही २) राधाबाई पाटील रा.चिंचपाडा नवी मुंबई पुर्ण नाव पत्ता माहीत नाही ३) कविता रा.बिबवेवाडी पुणे तसेच रबाळे, रेल्वे स्टेशन जवळ मुंबई पुर्ण नाव पत्ता माहीत नाही ४) सिमरन रा.बिबवेवाडी पुणे पुर्ण नाव पत्ता माहीत नाही ५) काजल रा. गल्ली नं. ६ विश्रांतवाडी पुणे पुर्ण नाव पत्ता माहीत नाही ६) रुतुजा जयेश मोडक रा. पर्वती दर्शन ११४/८ स्वारगेट मो.नं. ९६०७५९१०३४ मुळ राहणार - लालबाग मुंबई पुणे पुर्ण नाव पत्ता माहीत नाही ७) रुपाली पटेल सध्या राहणार – जगन्नाथ हॉटेल, सोमवार पेठ पुणे मुळ -- गुजरात ८) गौरव रा. शिवाजीपेठ कोल्हापुर ९) अनोळखी गि-हाईक याचे विरुध्द दाखल झालेला आहे. या आरोपीपैकी अ.क्र. ७, ८ यांना सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने तात्काळ ताब्यात घेवुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या ताब्यात देवुन त्यांनी सदर आरोपी यांना अटक केली आहे. यातील फिर्यादी अल्पवयीन पिडीत मुलीस रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

**वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, सपोनि शीतल भालेकर, सपोनि संपत पवार, सपोनि चंद्रकांत जाधव, प्रमोद म्हेत्रे, रमेश लोहकरे, संजय गिरमे, नामदेव शेलार,ननिता येळे, गितांजली जाधव, कविता नलावडे, राजेद्र कचरे, सचिन शिंदे, नितिन तेलंगे, सचिन कदम, सरस्वती कांगणे, रुपाली चांदगुडे यांनी केलेली आहे.**